नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३२४ Issue - 324 | वार बुधवार दि. १५ एप्रिल २०२६ Blow- Wednesday Date 15 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## पंतप्रधान मोदींसह राष्ट्रपतींकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारतरत्न डॉ. बाबासाहेब भीमराव आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक राजकीय नेत्यांनी त्यांना अभिवादन केलेआहे. यासोबतच उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेसचे खासदार मल्लिकार्जुन खर्गे तसेच इतर खासदारांनी संसद परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणा स्थळ येथे त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी 'एक्स'वर पोस्ट करत लिहिले, भारतीय संविधानाचे शिल्पकार आणि महान समाजसुधारक बाबासाहेब डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मी त्यांना विनम्र अभिवादन करते. बाबासाहेब हे न्यायशास्त्रज्ञ, अर्थतज्ज्ञ, गहन विचारवंत, विधिज्ञ आणि सम ताधिष्ठित सामाजिक व्यवस्थेचे ठाम पुरस्कर्ते होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजातील वंचित आणि दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी समर्पित केले आणि त्यांच्या हितासाठी ऐतिहासिक योगदान दिले.

राष्ट्रपती पुढे म्हणाल्या, त्यांनी केवळ असम ानता दूर करण्याचा मार्ग दाखवला नाही, तर भारताच्या लोकशाही मूल्यांना आणि घटनात्मक हक्कांना बळकटी देण्यातही महत्त्वाची भूमिका बजावली. डॉ. आंबेडकर यांनी महिलांच्या शिक्षणाला आणि त्यांच्या अधिकारांना प्राधान्य दिले. त्यांच्या बहुआयामी योगदानामुळे पुढील पिढ्यांना देशसेवा आणि विकासात सक्रिय सहभाग घेण्यासाठी प्रेरणा मिळत राहील. या निमित्ताने आपण सर्वांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या आदर्शांना आपल्या जीवनात आत्मसात करून न्याय्य, समावेशक आणि प्रगतिशील राष्ट्र उभारण्याचा संकल्प करूया. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एक्स'वरील आपल्या पोस्टमध्ये लिहिले, बाबासाहेब डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन. राष्ट्रनिर्मितीसाठी केलेले त्यांचे कार्य अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांचे जीवन आणि कार्य पिढ्यान्पिढ्या न्याय्य आणि प्रगतिशील समाज उभारण्यासाठी प्रेरणा देत राहील.

# राज्यात उष्णतेची लाट, अकोल्यात सर्वाधिक ४४ अंश तापमान

## राज्य सरकारकडून तीन व्यापक एसओपी जारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात उष्णतेची लाट पाहायला मिळत असून विदर्भात सर्वाधिक तापमान नोंद झाले आहे. अकोला जिल्ह्यात आज तापमान ४४ अंशांवर पोहोचले होते, त्याखालोखोल अमरावतीत ४३.८, सोलापूर जिल्ह्यात ४३.२ अंश तापमानाची नोंद झाली आहे.

त्यामुळे, उकाडा आणि कडक उन्हापासून बचाव करण्यासाठी, राज्य शासनाने राज्य उष्णता कृती आराखडा आणि भारतीय हवामान विभागाच्या रंग-कोडेड उष्णता सतर्कतांच्या अनुषंगाने उष्णतेच्या लाटांपासून नागरिकांचे, विशेषतः असुरक्षित घटकांचे संरक्षण करण्यासाठी तीन व्यापक मानक कार्यपद्धती जारी केल्या आहेत. उष्णता-संबंधित आजार व मृत्यू कमी करण्यासाठी या उपाययोजना उपयुक्त ठरणार असून, विशेषतः अनौपचारिक कामगार, खाण कामगार आणि कमी उत्पन्न गटांना मोठा दिलासा मिळणार असल्याचा विश्वास आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी व्यक्त केला.



या एसओपींचा मुख्य भर १५ उच्च-उष्णता-जोखम ीच्या जिल्ह्यातील बाहेरील अनौपचारिक कामगार, चंद्रपूरमधील कोळसा खाण कामगार तसेच उष्णता-प्रतिरोधक गृहनिर्माण आणि वसाहतींवर आहे. लातूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, अकोला, बुलडाणा, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, जळगाव, नंदुरबार, धुळे आणि नांदेड हे जिल्हे यामध्ये समाविष्ट आहेत.

पहिल्या एसओपीमध्ये रस्त्यावरील विक्रेते, बांधकाम मजूर, वाहतूक पोलीस, स्वच्छता कर्मचारी, डिलिव्हरी कामगार, रिक्षाचालक आदी बाहेर काम करणाऱ्या घटकांसाठी मार्गदर्शन करण्यात आले आहे. आयएमडीच्या पिवळ्या, केशरी आणि लाल सतर्कतांनुसार काम ाचे वेळापत्रक बदलणे, पाण्याचे ब्रेक, पाणी बूथ, ओआरएस वितरण, सावली व्यवस्था आणि आरोग्य सुविधा मजबूत करणे यासारख्या उपाययोजना करण्यात येणार आहेत.

एसओपींची प्रभावी अंमलबजावणी करावी - महाजन

देशातील दहा प्रमुख उष्ण राज्यांमध्ये महाराष्ट्र राज्याचाही समावेश आहे. वातावरणातील बदलांमुळे तापमान सातत्याने वाढत असून अनेक भागात तापमान ४७ ते ४९ अंश सेल्सियसपर्यंत पोहोचत आहे. राज्यात वाढत्या उष्णतेमुळे दक्षता घेण्याच्या सूचना राज्यातील सर्व जिल्हाधिकारी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागांना देण्यात आल्या आहेत. वाढत्या उष्णतेच्या अनुषंगाने जनजागृतीसाठी विशेष मोहिमाही राबवण्यात येणार असून या एसओपींची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी केले आहे.

अकोल्यात सर्वाधिक ४४, महाबळेश्वर सर्वात कमी ३४.५

अमरावती - ४३.८ यवतमाळ - ४२.६ सोलापूर - ४३.२ अकोला - ४४ वर्धा - ४३.५ नागपूर - ४२.२ गडचिरोली - ४२.६ चंद्रपूर- ४२.२ बुलढाणा - ४१.६ गोंदिया - ४१.१ सांगली - ४१.४ महाबळेश्वर- ३४.५ सातारा - ४०.९ नाशिक - ३९.३ बारामती - ४०.४ कोल्हापूर - ३८.९ उदगीर - ४०.४ नंदूरबार- ३९.३ पुणे - ३९.९ संभाजीनगर- ४१.४ रत्नागिरी - ३४ मुंबई (सांताक्रुज) - ३६ बीड - ४०.९ परभणी - ४२.१ मालेगाव - ४१.६ जळगाव - ४२.५

# वेदांता पॉवर प्लांटमध्ये भीषण स्फोट, ९ कामगारांचा अंत, ३० जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रायपूर : छत्तीसगडच्या सक्ती जिल्ह्यातील सिंघीतराय येथील वेदांता पॉवर प्लांटमध्ये मंगळवारी दुपारी एक भीषण द्रुघटना घडली. कारखान्यातील बॉयलरचा मोठा स्फोट झाला. प्राथमिक माहितीनुसार, या दुर्घटनेत ३० ते ४० मजूर गंभीर जखमी झाले. या स्फोटात आतापर्यंत ९ जणांचा मृत्यू झाला आहे. पोलीस अधीक्षकांनी या माहितीला दुजोरा दिला आहे. यातील चौघांचा जागीच मृत्यू झाला. तर पाच जणांनी उपचारादरम्यान अखेरचा श्वास घेतला.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, रायगढच्या फोर्टिस रुग्णालयात पाच जणांची प्राणज्योत मालवली. त्यांची मृत्यूसोबतची झुंज अपयशी ठरली. गंभीररित्या जखमी झालेले १८ मजूर फोर्टिसमध्ये दाखल आहेत. काही जखमींना रायगढच्या वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात पाठवण्यात आलं आहे. या दुर्घटनेनंतर परिसरात एकच घबराट पसरली. स्थानिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे.



मंगळवारी दुपारीच्या दोनच्या सुमारास कारखान्यात स्फोट झाला. त्यावेळी सगळे मजूर कारखान्यात काम करत होते. अचानक झालेल्या स्फोटाम ुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली. कामगारांची पळापळ सुरु झाली. आक्रोश आणि आरडाओरडा सुरु झाला. स्फोटानंतर लगेचच मदत आणि बचाव कार्य सुरु करण्यात आलं.

जखमी कामगारांना जवळच्या रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आलं आहे. त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. यातील काहींची प्रकृती नाजूक आहे. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे. प्रशासनानं दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत ९ कामगारांचा मृत्यू झाला आहे.

स्फोटाची माहिती मिळताच प्रशासन आणि पोलिसांचं पथक घटनास्थळी पोहोचलं. अग्निशमन आणि वैद्यकीय पथकंदेखील तिथे पोहोचली. स्फोटाम ागील नेमक्या कारणाचा अद्याप उलगडा झालेला नाही. तांत्रिक बिघाड किंवा सुरक्षेतील त्रुटीमुळे दुर्घटना झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार स्फोटाचा आवाज अतिशय मोठा होता. स्फोटानंतर पुढील काही सेकंदांत कारखान्याच्या चारही बाजू धूर पसरला. कारखान्याच्या प्रवेशद्वाराजवळ मोठी गर्दी जमली. बॉयलरचा स्फोट का आणि कसा झाला, याबद्दल अद्याप कोणतीही ठोस माहिती हाती आली नसल्याचं कंपनी व्यवस्थापनानं सांगितलं आहे. स्फोटाम ागील कारणाचा शोध घेतला जात आहे.

## बिहारमध्ये 'सम्राट' पर्व सुरू; उद्या सम्राट चौधरी बिहारच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पाटणा : बिहारच्या राजकारणात आज एक मोठी ऐतिहासिक घडामोड घडली आहे. सुमारे दोन दशके मुख्यमंत्रिपद भूषवल्यानंतर नितीश कुमार यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला असून, त्यांच्या जागी भाजपचे प्रदेशाध्यक्ष सम्राट



चौधरी यांची बिहारचे नवे मुख्यमंत्री म्हणून निवड करण्यात आली आहे. आज पाटणा येथील बिहार विधानसभा इमारतीच्या सेंट्रल हॉलमध्ये पार पडलेल्या एनडीएच्या महत्त्वपूर्ण बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

आज मंगळवारी नितीश कुमार यांनी आपल्या मंत्रिमंडळाची शेवटची बैठक घेऊन विधानसभा बरखास्त करण्याची शिफारस केली आणि त्यानंतर राज्यपालांकडे आपला राजीनामा सोपवला. नितीश कुमार यांनी यापूर्वीच ३० मार्च २०२६ रोजी विधान परिषदेच्या (चडउ) सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. १६ मार्च रोजी त्यांची राज्यसभा खासदार म्हणून निवड झाली असून, ११ एप्रिल रोजी त्यांनी खासदारकीची शपथ घेतली. आता ते राज्याच्या राजकारणातून केंद्रात, म्हणजेच दिल्लीत सक्रिय होणार आहेत. मात्र, जेडीयूचे कार्याध्यक्ष संजय कुमार झा यांनी स्पष्ट केले आहे की, नितीश कुमार जरी मुख्यमंत्री नसले तरी बिहारच्या विकासासाठी ते मार्गदर्शक म्हणून कायम सक्रिय राहतील.

भाजप विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत सम्राट चौधरी यांची नेतेपदी निवड करण्यात आली. त्यांचे नाव विजय कुमार सिन्हा यांनी प्रस्तावित केले, तर रेणू देवी, मंगल पांडे आणि दिलीप जयस्वाल यांनी त्यास अनुमोदन दिले. केंद्रीय निरीक्षक म्हणून उपस्थित असलेले केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी अधिकृतपणे सम्राट चौधरी यांच्या नावाची घोषणा केली. या बदलामुळे बिहारमध्ये भाजपच्या नेतृत्वाखालील नवीन सरकार स्थापन होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

नव्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी सोहळा उद्या होणार आहे. बिहार विधानसभेच्या एकूण २४३ सदस्यांच्या संख्याबळानुसार मंत्रिमंडळात ३६ मंत्र्यांचा समावेश होऊ शकतो. सूत्रांच्या माहितीनुसार, सध्याच्या मंत्रिमंडळातील बहुतांश मंत्र्यांना कायम ठेवले जाण्याची शक्यता असून, नवीन सरकारमध्ये केवळ काही किरकोळ बदल पाहायला मिळू शकतात. २०३० पर्यंतचा जनादेश हा नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली आणि एनडीएच्या पाठिंब्याने मिळाला असल्याने, नवीन सरकार नितीश कुमार यांचीच धोरणे पुढे नेणार असल्याचे पक्षाकडून सांगण्यात आले आहे.

# मुंबई महामानवांच्या विचारांना आणि कार्याला त्रिवार वंदन..!





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क** : महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल मा. श्री. जिष्णू देव वर्मा जी, मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस आणि उपमुख्यमंत्री मा. श्री. एकनाथजी शिंदे यांच्यासमवेत आज दादर येथील चैत्यभूमी येथे जाऊन महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले.

## संपादकीय....


### उष्णतेची लाट

राज्यात उष्णतेची लाट पाहायला मिळत असून विदर्भात सर्वाधिक तापमान नोंद झाले आहे. अकोला जिल्ह्यात आज तापमान ४४ अंशांवर पोहोचले होते, त्याखालोखोल अमरावतीत ४३.८, सोलापूर जिल्ह्यात ४३.२ अंश तापमानाची नोंद झाली आहे. त्यामुळे, उकाडा आणि कडक उन्हापासून बचाव करण्यासाठी, राज्य शासनाने राज्य उष्णता कृती आराखडा आणि भारतीय हवामान विभागाच्या रंग-कोडेड उष्णता सतर्कतांच्या अनुषंगाने उष्णतेच्या लाटांपासून नागरिकांचे, विशेषतः असुरक्षित घटकांचे संरक्षण करण्यासाठी तीन व्यापक मानक कार्यपद्धती जारी केल्या आहेत. उष्णता-संबंधित आजार व मृत्यू कमी करण्यासाठी या उपाययोजना उपयुक्त ठरणार असून, विशेषतः अनौपचारिक कामगार, खाण कामगार आणि कमी उत्पन्न गटांना मोठा दिलासा मिळणार आहे. या एसओपींचा मुख्य भर १५ उच्च-उष्णता-जोखमीच्या जिल्ह्यातील बाहेरील अनौपचारिक कामगार, चंद्रपूरमधील कोळसा खाण कामगार तसेच उष्णता-प्रतिरोधक गृहनिमर्ण आणि वसाहतींवर आहे. लातूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, अकोला, बुलडाणा, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, जळगाव, नंदुरबार, धुळे आणि नांदेड हे जिल्हे यामध्ये समाविष्ट आहेत.

# निफाडमध्ये श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्तींचा प्राणप्रतिष्ठा व कलशा रोहन सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड श्री विठ्ठल-रुक्मिणी देवस्थानच्या वतीने निफाड येथील पुरातन श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या नवीन मूर्तींच्या प्राणप्रतिष्ठा व कलशरोहन सोहळ्याचा भव्य धार्मिक उत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. चार दिवस चाललेल्या या सोहळ्यात भाविकांचा मोठा सहभाग पाहायला मिळाला.






गुरुवारी सकाळी मंदिरापासून मिरवणुकीला प्रारंभ करण्यात आला. सजवलेल्या रथामध्ये श्री विठ्ठल-रुक्मिणीची नवीन मूर्ती तर आकर्षक बैलगाडीत कलश ठेवण्यात आला होता. मिरवणुकीच्या अग्रभागी कलशधारी मुली, त्यानंतर वारकरी मंडळ सहभागी झाले होते. श्री विठ्ठल नामाचा जयघोष करत मिरवणूक उगाव रोड मार्गे मंदिरात पोहोचली. यामध्ये सजवलेले उंट, तसेच संगीताच्या तालावर नृत्य सादर करणारा अश्व हे विशेष आकर्षण ठरले. देवस्थानचे पदाधिकारी, नागरिक व भक्त मंडळ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते


शनिवारी शांतीसूक्त, स्थापित देवतांचे पूजन, अभिषेक, प्रधान हवन तसेच भव्य दीपोत्सव व महाआरती संपन्न झाली. यावेळी प.पू. दादा गुरु महाराज उपस्थित होते. रात्री ह.भ.प. मिलिंद चवडंके यांनी वारकरी व नाथ संप्रदायावर प्रवचन दिले.

श्रीमूर्ती प्राणप्रतिष्ठा, कलशरोहन व ध्वजस्थापना विधी पार पडले. संत एकनाथ महाराजांचे १४ वे वंशज ह.भ.प. गुरु योगीराज महाराज पैठणकर यांच्या हस्ते मूर्तींची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली, तर प.पू. गणेशगिरीजी महाराज यांच्या हस्ते कलशरोहन करण्यात आले.

यानंतर ह.भ.प. योगेश महाराज जाधव यांचे काल्याचे कीर्तन झाले उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

या चार दिवसीय सोहळ्याचे पौरोहित्य आचार्य राहुल कुलकर्णी, आचार्य दिलीप कुलकर्णी, आचार्य सारंग भार्गवे, आचार्य स्वप्निल जोशी, दर्शन जोशी, रोहन कुलकर्णी व सहकारी ब्रह्मवृंद यांनी केले. हा धार्मिक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री विठ्ठल-रुक्मिणी देवस्थान, निफाडकर नागरिक व भक्त मंडळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

# महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला सर्वात मोठे समतावादी संविधान दिले



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : समता स्वतंत्र बंधुता आणि न्याय या विज्ञानवादी विचारांचा आधार घेत महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाची निर्मिती केली या निर्मितीमुळे संपूर्ण देश आज खूप चांगल्या पद्धतीने महासत्तेच्या दिशेने जात असल्याचे दिसून येत आहे, प्रस्थापित लोकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह समाजातील जाति व्यवस्थेचा त्रास सहन करत अनेक वर्षे मनुवादानी छळले आणी पिळले लागला ,चवदार तळ्याचा सत्याग्रह आसो दलितांचे हक्क आणि मंदिर प्रवेशासाठी खूप मोठी चळवळ उभा केली महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर एक मोठी सामाजिक क्रांती केली डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या या प्रयत्नामुळे वंचित घटकातील लोकांना न्याय मिळाला हा न्याय फक्त संविधानाच्या चौकटीत राहूनच मिळाला आहे डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेले संविधान आणि त्या संविधानातील मूलभूत तत्वे अनमोल आहेत त्या तत्वानी देशाला समता समानता आणि अखंडता दिली त्यामुळे भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे प्रभावी माध्यम आहे असे प्रतिपादन नळदुर्ग येथील सामाजिक कार्यकर्ते तथा ड अरविंद बेडगे यांनी केले.

नळदुर्ग येथे नुकतेच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ व्या जयंती निमित्त पूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता त्या वेळेस ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

प्रथमता तथागत भगवान गौतम बुद्ध परमपूज्य बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्प दीप आणि धूप पूजन करण्यात आले.

यावेळी ड अरविंद बेडगे , सुशांत भूमकर , नळदुर्ग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकिशोर सोळंके यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रिपाइं धाराशिव जिल्ह्याचे उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे यांनी केले यावेळी नळदुर्ग येथील आय पी एस अधिकारी मेघना मॅडम, एवढे नळदुर्ग नगरीचे बांधकाम सभापती शशिकांत पुदाले, पाणीपुरवठा सभापती तानाजी जाधव, आरोग्य व दिवाबत्ती सभापती सुमनताई ठाकूर, अ‍ॅड. अरविंद बेडगे, नगरसेविका राणीताई सुरवसे, नगरसेविका साक्षी नळदुर्गकर , नगरसेवक तथा गटनेते दत्तात्रय दासकर, भाजपाचे नेते सुशांत भूमकर, श्रमिक पोद्दार , नगरसेवक तथा गटनेते मारुती खारवे, नगरसेविका कमलताई गायकवाड, पत्रकार आयुब शेख भगवंत सुरवसे, अजित चव्हाण, सामाजिक कार्यकर्त्या कल्पनाताई गायकवाड, नगरसेवक प्रवीण गायकवाड, अभियंता स्वप्नील काळे, भाजप लहुजी शक्ती सेनेचे राज्य कार्याध्यक्ष शिवाजी गायकवाड, उमेश नाईक जिल्हा परिषद स्पेशल शाळेचे मुख्याध्यापक शेख, सहशिक्षिका टिळक, अंगणवाडी शिक्षिका पिस्के, आदिजन उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार बौद्धाचार्य तथा पत्रकार दादासाहेब बनसोडे यांनी मानले

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अमरदीप लेझीम संघ यांच्या सर्व सदस्यांनी व तरुण भीमसैनिकाने परिश्रम घेतले.

# खामसवाडी येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

खामसवाडी /प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मध्ये भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव बोधिसत्व परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन सोसायटीचे चेअरमन मा. संजय भाऊ पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी सोसायटीचे व्हाईस चेअरमन मा.भगवान झोरी, मानव अधिकार आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत भाऊ पाटुळे, फुले विचार मंचचे सावता माळी, बाबु नाना शेळके, बिभिषण कांबळे, लिंबराज खरटमोल, मारुती लोंढे, बालाजी चौरे, रेवण माळी, निलेश पाटील, नाना वैद्य, दशरथ शेळके, सादिक भाई सय्यद, सोसायटीचे सचिव विजयकुमार देशमाने, हनुमंत कदम, दत्तात्रय शेळके, बिभीषण कोळी, सहशिक्षक अनंत बाबर, सुर्यकांत सौदागर,सुमीत वाघे, यांच्याही हस्तेही प्रतिमेचे पूजन करून पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले.

यावेळी या जयंती कार्यक्रमासाठी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आरक्षणातील उपवर्गीकरणासाठी मुदतवाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या अनुषंगाने निवेदन किंवा अर्ज सादर करण्यासाठीची मुदत वाढविण्यात आली आहे, अशी माहिती सामाजिक न्याय विभागामार्फत देण्यात आली आहे.




अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणासंदर्भात न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर (निवृत्त न्यायाधीश, उच्च न्यायालय, पाटणा) यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या एक सदस्यीय समितीने दिनांक १६ मार्च २०२६ रोजी आपला अहवाल शासनास सादर केला होता.

सदर अहवालावर आक्षेप, मते व निवेदन मागविणे तसेच त्यावर सुनावणी घेण्यासाठी शासन निर्णय दिनांक १० एप्रिल २०२६ अन्वये मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

यासमितीसमोर अहवालाबाबत मते व आक्षेप नोंदविण्यासाठी इच्छुकांना ई-मेलद्वारे नोंदणी करण्यासाठी यापूर्वी १५ एप्रिल २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र, विविध स्तरांवरून आलेल्या मागण्यांचा विचार करून संबंधितांना आपले अभिप्राय अधिक सविस्तरपणे मांडता यावेत यासाठी ही मुदत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार, आता इच्छुकांना आपले आक्षेप, मते किंवा निवेदन सादर करण्यासाठीची अंतिम मुदत दिनांक ३० एप्रिल २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

इच्छुकांनी आपले निवेदन किंवा अर्ज dg-sw@barti.in या ई-मेल आयडीवर सादर करावेत, असे आवाहन सामाजिक न्याय विभागामार्फत करण्यात आले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त टायगर ग्रुपच्या वतीने गरजु मुलींना सायकल वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त टायगर ग्रुपच्या वतीने गरजु मुलींना सायकल वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अक्कलकोट नगर परिषदेचे नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोल राजे भोसले , उपनगराध्यक्ष बंटी राठोड, नगरसेवक यशवंत तात्या धोंगडे, नगरसेवक अशोक जाधव, सिद्धाराम टाके, बालाजी पाटील, अतिष पवार, अभि लोकापुरे प्रवीण देशमुख, प्रवीण घाटगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांनी जयंतीच्या माध्यमातून टायगर ग्रुपचे अध्यक्ष सागर भाऊ शिरसाट (इर्श्रीश ढळसशी) व त्यांचे लहान बंधु अमर शिरसाट यांनी अनेक सामाजिक उपक्रम करत असतात त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याचे स्तुती नगराध्यक्ष यांनी केले व उपस्थितांना जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

मंडाळाच्या वतीने या शालेय मुलींना सायकल वाटप करण्यात आले.

प्रज्ञा घटकांबळे, दिव्या दत्तात्रय गायछोडे, विजयालक्ष्मी घटकांबळे, पोर्णिमा कोळी, रुपाली बनसोडे, साक्षी दसाडे, प्रतिक्षा नडगेरी, विजयालक्ष्मी कदम यांना सायकल देण्यात आले.

## स्वेरीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी

## शिक्षणतज्ज्ञ प्रा. आर. वाय. पाटील यांचे प्रतिपादन

# डॉ. आंबेडकर यांनी शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा हा मोलाचा मंत्र दिला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शिक्षण घेताना अनंत अडचणी आल्या. त्यातूनही त्यांनी उच्चशिक्षण घेवून समाजासाठी सर्वस्व अर्पिले. त्यांचे कार्य, त्याग आणि योगदान यांचे महत्व पाहता आज त्यांची जयंती जवळपास १३५ देशात साजरी केली जाते. तुम्ही असे कार्य करा की जगाला तुमच्या कार्याचा हेवा वाटेल. यासाठी जीवनाला सकारात्मकतेने पाहणे आवश्यक



राधानगरी, जि.कोल्हापूर) मधील आर.वाय. पाटील जनजागृती प्रशिक्षण केंद्राचे संस्थापक व वक्ते प्रा. आर.वाय पाटील हे सार सांगून 'माणसाला माणूस म्हणून वागणूक न देणाऱ्या माणसांसाठी आणि समाजात अज्ञानरूपी पसरलेल्या अंधाराला त्यांनी स्वेरी गीतातील शब्दांचा भावार्थ समजून सांगितला. पुढे बोलताना पाहुणे प्रा. आर.वाय. पाटील म्हणाले की, 'ग्रामीण देखील करणे गरजेचे आहे.' असे आवाहन करून त्यांनी महाड सत्याग्रह, मान सरोवर, चवदार तळे, मनुस्मृती दहन, दलित मंदिर डॉ. नीता तळवलकर यांनी विजेत्या विद्यार्थ्यांच्या नावांचे वाचन केले.

यावेळी अभियंता व ह.भ.प. शिवाजीराव रानमळे, साहेबराव भुसे, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस. व्ही. मांडवे, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, डॉ. नीता तळवलकर, इतर अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. डॉ. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन केले. संस्थेचे सचिव डॉ. सुरज रोंगे हे आपल्या भाषणातून डॉ. आंबेडकर यांच्या विचारांची मांडणी करताना म्हणाले की, 'परिस्थितीला सामोरे जाऊन आणि मनाची कणखरता ठेवून आपण शिक्षण घेतले पाहिजे त्यामुळे या सत्राकडे केवळ मार्गदर्शन म्हणून न पाहता यातून शिस्तीचे धडे घेतले पाहिजेत.' असे सांगून सर्व उपस्थितांचे आभार मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पंढरपूरात अभिवादन










**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क :**

पंढरपूर : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास प्रशासनाच्या वतीने पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी आमदार समाधान आवताडे, नगराध्यक्षा प्रणितीताई भालके, प्रांताधिकारी सचिन इथापे, सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, तहसिलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, पोलीस निरिक्षक दशरथ वाघमोडे, मध्यवर्ती जयंती समितीचे अध्यक्ष अभिराज उबाळे, उपाध्यक्ष विशाल मांदळे, कार्याध्यक्ष महेश मोटे, नगरपरिषदेचे नगरसेवक

यांच्यासह पदाधिकारी, मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार समाधान आवताडे, नगराध्यक्षा प्रणितीताई भालके व प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिमेचे पूजन व पंचशील ध्वज लोकार्पण करण्यात आले. तसेच महाड (जि. रायगड) येथील चवदार तळे येथून पायी आणलेल्या भीम ज्योतीचे स्वागत आमदार समाधान आवताडे, नगराध्यक्षा प्रणितीताई भालके, प्रांताधिकारी सचिन इथापे, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत ढगळे यांच्यावतीने अभिवादनस्थळी करण्यात आले

# उजनी धरणातून १५ एप्रिल पासून भीमा नदीत पाणी सोडणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कुणाचा तालुका वाढत आहे पिकांना पाणी लागत आहे. त्यामुळे उजनी धरणातून पिकासाठी पाणी सोडावे अशी शेतकऱ्याकडून मागणी होत आहे. याची दखल घेऊन प्रशासनाने १५ एप्रिल पासून भीमा नदीत पाणी सोडण्याचे निर्णय घेतला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे. गेल्या वर्षी पाऊस चांगला पडल्यामुळे उजनी धरण १०० टक्के भरले होते. त्यामुळे शेतीसाठी दोन अवतनी कालव्याद्वारे सोडण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. मात्र अकोला तालुक्यातील शेतकऱ्यांना शेती या पाण्यासाठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे उजनी धरणातील पाणी अक्कलकोट तालुक्यातील सोडण्यात यावे अशी मागणी होत आहे. उजनी धरणातून भीमा नदीमध्ये पाणी सोडण्यात येणार आहे.

# खामसवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे/ खामसवाडी प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये राज्य घटनेचे शिल्पकार,भारतरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शाळेमध्ये जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. या जयंतीचे औचित्य साधून मंथन, सामान्यज्ञान,परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार व बक्षीस वितरण सोहळा यावेळी पार पडला.

यामध्ये इयत्ता १ ली मधील विराज सिरसट, तेजस्वी तिबोले, श्रीजीत देवकर, इयत्ता२ री मधील कार्तिक हिलकुटे, समृद्धी कोळी, योगेश्वरी जोशी,इयत्ता३ री मधील ओमप्रकाश झोरी, आशिष बंडगर, शर्वरी माळी,

### जयंती निमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा केला सत्कार

तसेच इयत्ता ४थी मधील स्वराली झोरी, अक्षता बाबर, संपदा झोरी या विद्यार्थ्यांचा बक्षीस देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमा दरम्यान विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रेरणादायी भाषणे सादर केली, ज्यामुळे उपस्थितांना प्रेरणा मिळाली.

या कार्यक्रमास मुख्याध्यापक श्री. मोरे सुरेश,शिक्षक श्री. बाकले शिवराज, शेळके नागनाथ, लोखंडे सातलिंग, गायकवाड विश्वास, श्रीम. किरदत्त संगिता, रितापुरे रेखा, मुळे वैशाली,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजकुमार शेळके,उपाध्यक्ष श्रीनिवास झोरी, सदस्य कोळी शुक्राचार्य, वाजेद आत्तार, महेश शेळके, पालक, शिक्षणप्रेमी नागरिक तसेच पत्रकार बंधू या वेळी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या यशामुळे शाळेचा गौरव वाढला असून, हा उपक्रम प्रेरणादायी ठरला आहे.

# सोलापूर जिल्हा परिषदेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

### जयंती निमित्त भिमगितांनी दणाणले सभागृह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती सोलापूर जिल्हा परिषदेत विविध कार्यक्रमांनी साजरी करणेत आली. विविध भिमगीतांनी सभागृह दणाणून गेले.

जिल्हा परिषदेचे आवारातील संविधान कोनशिलेस जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दिपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजित पवार समाजकल्याण विभागाच्या सभापती संस्कृती सातपुते, कृषि व पशुसंवर्धन समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला व बालकल्याण समितीचे सभापती ॲड. अमृता वाघे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी संदीप कोहिणकर यांचे हस्ते पुष्प अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मराठी सेवा संघाचे वतीने पक्षांसाठी सुरू केलेले पाण्याचे व्यवस्थेचा शुभारंभ मान्यवरांचे हस्ते करणेत आला.

यशवंतराव चव्हाण सभागृहात प्रारंभी दिप प्रज्वलन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेचे पूजन मान्यवरांचे हस्ते करणेत आले.

प्रारंभी समाज कल्याण अधिकारी प्रसाद मिरकले यांनी संविधान उद्देशिका वाचन केले. या कार्यक्रमासाठी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दिपक वैद्य, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजित पवार, समाजकल्याण विभागाच्या सभापती संस्कृती सातपुते, कृषि व पशुसंवर्धन समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला व बालकल्याण समितीचे सभापती ॲड. अमृता वाघे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी संदीप कोहिणकर, प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, उप मुख्य कार्यकारी सुर्यकांत भुजबळ, कार्यकारी अभियंता संतोष



कुलकर्णी, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, शिक्षणाधिकारी कादर शेख , कास्ट्राईब कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अरूण क्षिरसागर, लिपिक वर्गीय संघटनेचे अध्यक्ष अविनाश गोडसे, अधिक्षक गिरीष जाधव, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, रणजित घोडके, अभिमन्यु कांबळे , विस्तार अधिकारी मनोज म्हेत्रे यांचेसह सर्व खातेप्रमुख हे प्रमुख उपस्थित होते.

# कोर्टी येथील फाटे ट्रॅक्टर शोरूम येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

### आंबेडकरांनी उपेक्षितांना हक्क मिळवून देत आधुनिक भारताचा पाया रचला : नागेश फाटे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/ प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील कोर्टी येथील फाटे ट्रॅक्टर शोरूम येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष उद्योग, व्यापार विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांनी सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. ते पुढे बोलताना म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार असून, त्यांनी अथक परिश्रम घेऊन जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना तयार केली. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायावर आधारित या संविधानाने उपेक्षितांना हक्क मिळवून देत आधुनिक भारताचा पाया रचला. महान अशा महापुरुषाचे विचार आत्मसात करणे आणि अमलात आणणे सध्याची गरज असल्याचे मत फाटे यांनी जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले.

यावेळी सुधाकर बागल, डॉ. रमेश फाटे, प्रकाश गायकवाड, उमेश फाटे, वैभव बागल ,शुभम फाटे, निवृत्ती पाटील, संतोष पुणेकर, ओंकार कटले, समाधान बागल, ऋषी बागल, शरद थिटे, बबन आदमिले आदी उपस्थित होते.

### कल्याणशेट्टी महाविद्यालयात डॉ आंबेडकर जयंती निमित्त व्याख्यान प्रसंगी प्रतिपादन

# डॉ. आंबेडकर यांचे विचार आत्मसात करून नव समाजाच्या निर्मितीसाठी सज्ज व्हावे : प्रा. डॉ. नारायण बनसोडे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील अन्याय, विषमता आणि जाती भेदभाव यावर कठोर प्रहार करत समतेचा, न्यायाचा मार्ग दाखविला त्यामुळे पददलित, वंचित, उपेक्षित समाजाला न्याय मिळाला म्हणून विद्यार्थ्यांनी त्यांचे हे विचार आत्मसात करून नव समाजाच्या निर्मितीसाठी सज्ज व्हावे असे प्रतिपादन प्रा डॉ नारायण बनसोडे यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या व्याख्यान प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, जातीव्यवस्था कठोर होत चालली आहे, त्यासाठी समता, बंधुता या मूल्यांचा प्रचार सर्व समाजामध्ये होणे गरजेचे झाले आहे. डॉ आंबेडकर यांच्या विचारातील प्रगत, न्याय्यीक समाज निर्माण करण्याची जबाबदारी देखील आपल्यावर आली आहे, त्यासाठी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश आत्मसात करून नव तंत्रज्ञानाचा ध्यास घेत संशोधन करून उच्च पदावर अरुढ झाले पाहिजे, त्यानंतर धीरोदत्तपणे, संयमाने नव समाज निर्मितीसाठी योगदान द्यावे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन प्राध्यापिका मधुबाला लोणारी यांनी केले तर आभार प्रा सौरभ भस्मे यांनी मानले.

कार्यक्रमास कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार, प्राध्यापिका डॉ शितल झिंगाडे भस्मे, प्रा शितल फुटाणे, हर्षदा गायकवाड उपस्थित होते.

### डॉ आंबेडकर यांचा आदर्श विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे

**डॉ आंबेडकर यांनी प्रखर बुद्धिमत्तेच्या जोरावर सामाजिक स्थितीवर दुर्मिळ ग्रंथरचना केली त्यांचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी व्हाट्सअप, फेसबुक आणि ट्विटरचा त्याग करून ग्रंथांचे वाचन करावे. चिंतन मनन करून प्रगत समाजाच्या उभारणीसाठी कार्यरत व्हावे असे मत प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी यांनी व्यक्त केले.**

# स्मरण नव्हे, आचरणाचा संकल्प!

## बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त प्रेरणादायी उपक्रम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : दि. १४ एप्रिल २०२६ रोजी विश्वरत्न, घटनाकार, बोधिसत्व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त केवळ स्मरण नव्हे, तर त्यांच्या विचारांचे आचरण करूया असा संदेश देणारा आगळावेगळा उपक्रम राबविण्यात येत आहे. हा उपक्रम दि. १४/०४/२०२६ ते दि. २०/०४/२०२६ या कालावधीत जनता संघर्ष न्यूज चॅनलच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे.या उपक्रमांतर्गत प्रशासकीय सेवा, शिक्षण, सामाजिक क्षेत्र तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वाक्षरीचे प्रतीक असलेला विशेष पेन प्रदान करण्यात येत आहे. बाबासाहेबांनी दिलेला ज्ञान, समानता आणि न्यायाचा संदेश समाजात रुजवण्याचा आणि नव्या पिढीला प्रेरणा देण्याचा हा एक स्तुत्य प्रयत्न असल्याचे मत पत्रकार सिद्धार्थ भडकुंबे यांनी व्यक्त केले.

या उपक्रमांतर्गत प्रशासकीय अधिकारी, समाजसेवक, पत्रकार बांधव, चळवळीतील कार्यकर्ते तसेच राजकीय क्षेत्रातील व्यक्तींना बाबासाहेबांच्या स्वाक्षरीचे पेन भेट देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. या स्तुत्य उपक्रमाबद्दल सर्व स्तरांतून सिद्धार्थ भडकुंबे यांचे कौतुक होत असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक क्रांतीकार्य



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

१४ एप्रिल हा दिवस भारतीय समाजजीवनात एक विशेष तेज घेऊन उगवतो. हा दिवस केवळ एका महामानवाचा जन्मदिन नसून, तो अन्यायाविरुद्धच्या संघर्षाचा, समतेच्या ध्यासाचा आणि मानवी प्रतिष्ठेच्या पुनर्स्थापनेचा स्मरणदिन आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य समजून घेतले तर हे प्रकर्षाने जाणवते की त्यांनी भारतीय समाजाला केवळ विचार दिले नाहीत, तर त्या विचारांना कृतीत उतरवून एक नवा सामाजिक इतिहास घडवला.

भारतीय समाजाची पारंपरिक रचना ही अत्यंत गुंतागुंतीची आणि विषमतेने ग्रासलेली होती. जातिव्यवस्थेने समाजात उंच-नीचतेची भिंत इतकी भक्कम उभी केली होती की, काही घटकांना मानवी हक्कांपासून पूर्णतः वंचित ठेवण्यात आले होते. अस्पृश्यता ही केवळ सामाजिक भेदभावाची गोष्ट नव्हती, तर ती मानवी अस्तित्वाला नाकारणारी एक क्रूर आणि अमानुष व्यवस्था होती. अशा परिस्थितीत जन्माला आलेल्या बाबासाहेबांनी या व्यवस्थेचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. बालपणापासूनच त्यांना सहन करावे लागलेले अपमान, शाळेत पाणी पिण्याची परवानगी न मिळणे, समाजातील तिरस्काराची वागणूक या सर्व अनुभवांनी त्यांच्या मनात अन्यायाविरुद्ध तीव्र असंतोष निर्माण केला. परंतु त्यांनी या अनुभवांना दुःख म्हणून न जगता, त्यांना परिवर्तनाच्या ऊर्जेमध्ये रूपांतरित केले.

बाबासाहेबांच्या सामाजिक कार्याचा पाया म्हणजे शिक्षण होय. त्यांनी अत्यंत कठीण परिस्थितीतही उच्च शिक्षण प्राप्त केले. त्यांनी केवळ भारतातच नव्हे, तर परदेशातही शिक्षण घेतले आणि आपल्या ज्ञानाच्या बळावर समाजातील विषमतेला आव्हान दिले. त्यांच्या मते, शिक्षण हे केवळ नोकरी मिळवण्याचे साधन नसून, ते व्यक्तीच्या विचारशक्तीला विकसित करणारे आणि समाजपरिवर्तन घडवून आणणारे प्रभावी माध्यम आहे. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा त्यांचा संदेश हा केवळ घोषवाक्य नसून, तो सामाजिक क्रांतीचा मूलमंत्र आहे. त्यांच्या कार्याचा विचार करताना बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना ही एक महत्त्वाची घटना ठरते. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी वंचित समाजासाठी शिक्षण, सामाजिक जागृती आणि स्वाभिमान निर्माण करण्याचे कार्य केले. त्यांनी लोकांना सांगितले की, आपले हक्क मिळवण्यासाठी स्वतः उभे राहणे आवश्यक आहे. त्यासाठी संघटनशक्ती आणि ज्ञानाची जोड असणे गरजेचे आहे.

महाड येथील चवदार तळे सत्याग्रह हा त्यांच्या सामाजिक आंदोलनातील एक ऐतिहासिक टप्पा होता. हा केवळ पाण्यासाठीचा संघर्ष नव्हता, तर तो मानवी समानतेचा आणि स्वाभिमानाचा लढा होता. या सत्याग्रहाने संपूर्ण देशाचे लक्ष अस्पृश्यतेच्या प्रश्नाकडे वेधले. बाबासाहेबांनी स्पष्टपणे सांगितले की, आम्हाला पाणी नको, आम्हाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क हवा आहे. या आंदोलनामुळे वंचित समाजात आत्मविश्वास निर्माण झाला आणि त्यांनी आपल्या हक्कांसाठी लढण्यास सुरुवात केली. याचप्रमाणे नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश आंदोलनाने धार्मिक क्षेत्रातील भेदभावाला थेट आव्हान दिले. मंदिरात प्रवेश हा केवळ धार्मिक हक्क नव्हता, तर तो सामाजिक समानतेचा प्रश्न होता. बाबासाहेबांनी या आंदोलनाच्या माध्यमातून समाजाला दाखवून दिले की, धर्माच्या नावाखाली कोणत्याही प्रकारचा भेदभाव स्वीकारार्ह नाही.

बाबासाहेबांच्या विचारांमध्ये तर्कशुद्धता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन स्पष्टपणे दिसून येतो. त्यांनी अंधश्रद्धा, परंपरा आणि रूढी यांच्या नावाखाली चालणाऱ्या अन्यायाला विरोध केला. त्यांच्या मते, कोणतीही सामाजिक व्यवस्था ही मानवी कल्याणासाठी असावी. जर ती मानवी हक्कांचे उल्लंघन करत असेल, तर ती बदलली पाहिजे. त्यांनी मनुस्मृतीतील विषमतावादी विचारांना विरोध करून सामाजिक क्रांतीची दिशा दिली.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी केलेले कार्यही अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्या काळात महिलांना अनेक बंधनांमध्ये ठेवले जात होते. त्यांना शिक्षणाचा, संपत्तीचा आणि स्वातंत्र्याचा अधिकार नव्हता. बाबासाहेबांनी महिलांच्या हक्कांसाठी आवाज उठवला आणि त्यांना समान अधिकार मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या मते, समाजाची प्रगती ही महिलांच्या प्रगतीवर अवलंबून असते. म्हणूनच त्यांनी महिलांना शिक्षण घेण्यास आणि स्वावलंबी होण्यास प्रोत्साहन दिले.

कामगारांच्या हक्कांसाठी त्यांनी केलेले कार्यही उल्लेखनीय आहे. औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना अत्यंत कठीण परिस्थितीत काम करावे लागत होते. बाबासाहेबांनी कामगारांसाठी योग्य वेतन, सुरक्षित कामाची परिस्थिती आणि मर्यादित कामाचे तास यासाठी संघर्ष केला. आठ तासांचा कामाचा दिवस ही संकल्पना त्यांनी प्रभावीपणे मांडली. यामुळे कामगारांच्या जीवनमानात मोठी सुधारणा झाली.

बाबासाहेबांचे कार्य केवळ सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी राजकीय क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीत मोलाची भूमिका बजावली. या राज्यघटनेच्या माध्यमातून त्यांनी प्रत्येक नागरिकाला समान हक्क, स्वातंत्र्य आणि न्याय मिळवून दिला. त्यांच्या या कार्यामुळे भारत एक लोकशाहीवादी आणि समताधिष्ठित राष्ट्र म्हणून उभा राहिला.

धर्माच्या बाबतीत त्यांनी स्वतंत्र आणि मानवतावादी दृष्टिकोन मांडला. त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारून समाजाला समता, करुणा आणि बंधुतेचा संदेश दिला. त्यांच्या मते, धर्म हा मानवी कल्याणासाठी असावा आणि तो समाजात समानता निर्माण करणारा असावा. बौद्ध धर्माच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक परिवर्तनाचा नवा मार्ग दाखवला. बाबासाहेबांचे जीवन हे संघर्ष, जिद्द आणि धैर्य यांचे प्रतीक आहे. त्यांनी प्रत्येक अडथळ्याला संधीमध्ये रूपांतरित केले आणि आपल्या ध्येयासाठी अखंड प्रयत्न केले. त्यांच्या कार्यामुळे समाजातील वंचित घटकांना नवे आयुष्य मिळाले आणि त्यांनी स्वाभिमानाने जगण्यास सुरुवात केली.

बाबासाहेबांचे कार्य केवळ सामाजिक सुधारणांपुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी भारतीय राष्ट्राच्या घडणीमध्ये मूलभूत बदल घडवून आणले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अतुलनीय आहे. स्वातंत्र्यानंतर भारतासमोर सर्वात मोठे आव्हान होते ते म्हणजे विविधतेने नटलेल्या समाजाला एकसंध, न्याय्य आणि लोकशाहीवादी चौकट प्रदान करणे. बाबासाहेबांनी या जबाबदारीचे ओझे अत्यंत सक्षमपणे उचलले. त्यांनी तयार केलेल्या राज्यघटनेत समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले. प्रत्येक नागरिकाला मूलभूत हक्क देताना त्यांनी सामाजिक आणि आर्थिक न्यायालाही तितकेच महत्त्व दिले. त्यांच्या दृष्टीने लोकशाही ही केवळ राजकीय पद्धती नव्हती, तर ती सामाजिक जीवनपद्धती होती. राज्यघटनेतील मूलभूत हक्कांची तरतूद ही त्यांच्या दूरदृष्टीचे प्रतीक आहे. त्यांनी अस्पृश्यता निर्मूलनासाठी स्पष्ट कायदेशीर बंदी घातली. ही केवळ कायद्याची तरतूद नव्हती, तर ती शतकानुशतकांच्या अन्यायाविरुद्धची ठाम भूमिका होती. याचबरोबर त्यांनी अनुसूचित जाती आणि जमातींसाठी आरक्षणाची व्यवस्था निर्माण केली, ज्यामुळे वंचित घटकांना शिक्षण आणि नोकरीत संधी मिळाली. ही व्यवस्था सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली.

बाबासाहेबांचे आर्थिक विचारही अत्यंत प्रगत आणि दूरदर्शी होते. त्यांनी अर्थव्यवस्थेकडे केवळ उत्पादन आणि वितरणाच्या दृष्टीने पाहिले नाही, तर त्याला सामाजिक न्यायाशी जोडले. त्यांच्या मते, आर्थिक विषमता ही सामाजिक विषमतेचे एक प्रमुख कारण आहे. त्यामुळे त्यांनी संपत्तीचे न्याय्य वितरण, कामगारांचे हक्क आणि शेतकऱ्यांचे कल्याण यावर भर दिला. त्यांनी औद्योगिकीकरणाचे समर्थन केले, परंतु त्याचवेळी कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करण्यावरही जोर दिला.

बाबासाहेबांनी राजकारणात प्रवेश केला तो केवळ सत्तेसाठी नव्हे, तर सामाजिक न्यायासाठी. त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करून कामगार आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांना राजकीय व्यासपीठ दिले. त्यांनी निवडणुकांमध्ये भाग घेतला आणि वंचित घटकांच्या आवाजाला संसदेत स्थान मिळवून दिले. त्यांच्या राजकारणाचा समानता आणि न्याय केंद्रबिंदू होता.

धर्माच्या बाबतीत बाबासाहेबांनी अत्यंत स्वतंत्र आणि तर्कशुद्ध दृष्टिकोन मांडला. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, धर्म हा मानवी कल्याणासाठी असावा. जर धर्म मानवी हक्कांचे उल्लंघन करत असेल, तर तो स्वीकारार्ह नाही. याच विचारातून त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारण्याचा निर्णय घेतला. बौद्ध धर्मात समता, करुणा आणि बंधुता या मूल्यांना प्राधान्य दिले जाते. त्यामुळे त्यांनी लाखो अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारून सामाजिक क्रांतीचा नवा अध्याय सुरू केला. बौद्ध धर्म स्वीकारणे हे केवळ धार्मिक परिवर्तन नव्हते, तर ते सामाजिक आणि मानसिक गुलामगिरीतून मुक्त होण्याचे प्रतीक होते. त्यांनी समाजाला दाखवून दिले की, आत्मसन्मान आणि स्वातंत्र्य मिळवण्यासाठी विचारांमध्ये बदल करणे आवश्यक आहे. त्यांच्या या निर्णयामुळे समाजातील वंचित घटकांना नवी ओळख आणि आत्मविश्वास मिळाला.

बाबासाहेबांचे लेखनही त्यांच्या विचारांचा महत्त्वपूर्ण भाग आहे. त्यांनी अनेक ग्रंथ लिहून समाजातील विषमतेचे विश्लेषण केले आणि त्यावर उपाय सुचवले. त्यांच्या लेखनात तर्कशुद्धता, स्पष्टता आणि सामाजिक बांधिलकी दिसून येते. त्यांनी समाजाला विचार करण्याची आणि प्रश्न विचारण्याची प्रेरणा दिली.

आजच्या काळात बाबासाहेबांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. तंत्रज्ञान आणि आर्थिक प्रगती झाली असली तरी सामाजिक विषमता अजूनही पूर्णपणे नाहीशी झालेली नाही. जात, लिंग, धर्म आणि आर्थिक स्थिती यांच्या आधारावर भेदभाव अजूनही दिसून येतो. अशा परिस्थितीत बाबासाहेबांचे विचार आपल्याला मार्गदर्शन करतात.

त्यांनी दिलेला संदेश आजही तितकाच प्रभावी आहे स्वतःवर विश्वास ठेवा, शिक्षण घ्या आणि अन्यायाविरुद्ध लढा द्या. हा संदेश केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी नाही, तर सामाजिक परिवर्तनासाठीही महत्त्वाचा आहे. बाबासाहेबांचे जीवन हे एक प्रेरणादायी उदाहरण आहे की, कठीण परिस्थितीतही आपण आपल्या ध्येयासाठी प्रयत्न करत राहिलो, तर यश निश्चित मिळते. त्यांनी आपल्या कर्तृत्वाने हे सिद्ध केले की, ज्ञान, परिश्रम आणि दृढनिश्चय यांच्या बळावर कोणतीही अडचण पार करता येते.

बाबासाहेबांच्या सामाजिक चळवळींचा प्रभाव केवळ त्यांच्या काळापुरता मर्यादित राहिला नाही, तर तो आजच्या आधुनिक भारतातही प्रकर्षाने जाणवतो. त्यांनी उभारलेली समतेची चळवळ ही भारतीय समाजाच्या परिवर्तनाची पायाभूत शक्ती ठरली. अस्पृश्यता निर्मूलनासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे समाजात मोठ्या प्रमाणात जागृती निर्माण झाली. जरी आजही काही प्रमाणात भेदभाव अस्तित्वात असला, तरी त्याविरुद्ध लढण्याची ताकद आणि जाणीव समाजात निर्माण झाली आहे, हे त्यांच्या कार्याचेच फलित आहे.

शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांनी दिलेला भर हा आजच्या भारताच्या प्रगतीचा मुख्य आधार आहे. आज समाजातील विविध घटक उच्च शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात यश संपादन करत आहेत. यामागे बाबासाहेबांनी निर्माण केलेली शैक्षणिक जागृती ही मोठी कारणीभूत आहे. त्यांनी शिक्षणाला केवळ ज्ञान मिळवण्याचे साधन न मानता, ते सामाजिक परिवर्तनाचे माध्यम मानले. आजच्या काळातही शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे, ही बाब त्यांच्या विचारांचीच साक्ष देते.

युवा पिढीसाठी बाबासाहेबांचे विचार अत्यंत प्रेरणादायी आहेत. आजचा युवक तंत्रज्ञान, विज्ञान आणि जागतिकीकरणाच्या युगात जगत असला, तरी त्याच्यासमोर अनेक सामाजिक आणि नैतिक आव्हाने आहेत. बेरोजगारी, स्पर्धा, सामाजिक ताणतणाव आणि मूल्यांचा ऱ्हास या समस्या आजच्या युवकांसमोर उभ्या आहेत. अशा परिस्थितीत बाबासाहेबांचा 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा संदेश युवकांना दिशा देणारा आहे. त्यांनी दिलेला आत्मसन्मानाचा आणि स्वावलंबनाचा विचार युवकांना सशक्त बनवतो.

महिलांच्या सक्षमीकरणाच्या बाबतीतही बाबासाहेबांचे योगदान आजही अत्यंत महत्त्वाचे आहे. आज महिलांनी शिक्षण, रोजगार, राजकारण आणि विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय प्रगती केली आहे. यामागे बाबासाहेबांनी केलेल्या कायदेशीर आणि सामाजिक सुधारणा मोठ्या प्रमाणात कारणीभूत आहेत. त्यांनी महिलांना समान हक्क मिळवून देण्यासाठी केलेले प्रयत्न आजच्या स्त्रीसशक्तीकरणाच्या चळवळींचे आधारस्तंभ आहेत.

बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव केवळ सामाजिक क्षेत्रापुरता मर्यादित नसून, तो राजकीय आणि प्रशासनिक क्षेत्रातही दिसून येतो. भारतीय राज्यघटना ही त्यांच्या दूरदृष्टीचे आणि समतेच्या तत्त्वज्ञानाचे जिवंत उदाहरण आहे. आजही देशातील न्यायव्यवस्था, शासनव्यवस्था आणि लोकशाही मूल्ये या राज्यघटनेच्या आधारावर कार्यरत आहेत. प्रत्येक नागरिकाला मिळणारे मूलभूत हक्क हे त्यांच्या कार्याचे अमूल्य योगदान आहे.

समकालीन भारतात सामाजिक माध्यमांचा आणि तंत्रज्ञानाचा प्रभाव वाढला आहे. या माध्यमांद्वारे माहितीचा प्रसार जलद गतीने होत आहे. परंतु त्याचबरोबर चुकीची माहिती, द्वेष आणि भेदभाव यांचाही प्रसार होतो. अशा परिस्थितीत बाबासाहेबांचा तर्कशुद्ध आणि वैज्ञानिक दृष्टिकोन अत्यंत आवश्यक ठरतो. त्यांनी समाजाला विचार करण्याची आणि सत्य शोधण्याची प्रेरणा दिली. आजच्या काळात ही प्रेरणा अधिकच महत्त्वाची आहे.

बाबासाहेबांच्या विचारांचा जागतिक पातळीवरही प्रभाव दिसून येतो. मानवाधिकार, सामाजिक न्याय आणि समानता या मूल्यांवर आधारित त्यांचे तत्त्वज्ञान जगभरात मान्य केले जाते. त्यांनी मांडलेले विचार हे केवळ भारतीय समाजासाठीच नव्हे, तर संपूर्ण मानवजातीसाठी उपयुक्त आहेत. त्यांच्या कार्यामुळे भारताला जागतिक स्तरावर एक प्रगत आणि लोकशाहीवादी राष्ट्र म्हणून ओळख मिळाली.

आजच्या काळात सामाजिक न्यायाचा प्रश्न अजूनही पूर्णपणे सुटलेला नाही. आर्थिक विषमता, शैक्षणिक असमानता आणि सामाजिक भेदभाव या समस्या अजूनही अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत बाबासाहेबांचे विचार आपल्याला योग्य दिशा दाखवतात. त्यांनी दिलेला संदेश म्हणजे संघर्षातून परिवर्तन घडवून आणण्याचा मार्ग. त्यांनी शिकवले की, अन्यायाविरुद्ध लढणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. बाबासाहेबांचे जीवन हे एक प्रेरणादायी उदाहरण आहे की, कोणत्याही परिस्थितीत आपण आपल्या ध्येयाप्रती निष्ठावंत राहिलो, तर यश निश्चित मिळते. त्यांनी आपल्या कर्तृत्वाने समाजातील प्रत्येक घटकाला उभे राहण्याची आणि स्वतःच्या हक्कांसाठी लढण्याची प्रेरणा दिली.

बाबासाहेबांचे कार्य हे केवळ एका काळापुरते मर्यादित नसून ते सर्वकालीन आणि सर्वसमावेशक आहे. आजच्या समकालीन भारतात आपण वेगाने बदलणाऱ्या सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक परिस्थितीत जगत आहोत. एका बाजूला विज्ञान-तंत्रज्ञानामुळे प्रगतीचे नवीन क्षितिज खुले होत असताना, दुसऱ्या बाजूला सामाजिक विषमता, आर्थिक दरी, जातीय आणि लैंगिक भेदभाव, तसेच नैतिक मूल्यांचा ऱ्हास यांसारखी आव्हाने अजूनही कायम आहेत. या पार्श्वभूमीवर बाबासाहेबांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. सामाजिक न्याय हा बाबासाहेबांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. त्यांच्या मते, समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी मिळाल्याशिवाय खरी प्रगती होऊ शकत नाही. आजही शिक्षण, रोजगार आणि आरोग्य या क्षेत्रांमध्ये असमानता दिसून येते. ग्रामीण आणि शहरी भागातील दरी, डिजिटल विभाजन, आर्थिक दुर्बलता या समस्या समाजाच्या सर्वांगीण विकासाला अडथळा निर्माण करतात. अशा परिस्थितीत बाबासाहेबांनी मांडलेले समतेचे तत्त्वज्ञान आपल्याला या समस्यांवर उपाय शोधण्याची दिशा देते.

जातीय भेदभाव हा आजही समाजातील एक संवेदनशील मुद्दा आहे. जरी कायद्याने अस्पृश्यता बंद करण्यात आली असली, तरी मानसिकतेत अजूनही बदल पूर्णपणे झालेला नाही. बाबासाहेबांनी केवळ कायदे करून थांबले नाहीत, तर त्यांनी समाजाच्या मानसिकतेत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मते, खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवून आणण्यासाठी मनोवृत्ती बदलणे आवश्यक आहे. आजच्या काळात हीच गोष्ट अधिक महत्त्वाची ठरते.

महिलांच्या सक्षमीकरणाच्या बाबतीतही अजून बरेच काम करणे आवश्यक आहे. जरी महिलांनी विविध क्षेत्रांमध्ये प्रगती केली असली, तरी त्यांना अजूनही अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. लैंगिक भेदभाव, हिंसा, आर्थिक असमानता या समस्या अजूनही अस्तित्वात आहेत. बाबासाहेबांनी महिलांना समान हक्क मिळवून देण्यासाठी केलेले कार्य आजही मार्गदर्शक आहे. त्यांच्या विचारांचा आधार घेऊन महिलांच्या सक्षमीकरणासाठी अधिक ठोस पावले उचलणे गरजेचे आहे. युवा पिढी ही देशाचे भविष्य आहे. बाबासाहेबांनी युवकांना शिक्षण आणि स्वावलंबनाचे महत्त्व पटवून दिले. आजच्या युवकांसमोर अनेक संधी उपलब्ध आहेत, परंतु त्याचबरोबर अनेक आव्हानेही आहेत. स्पर्धेचा वाढता ताण, बेरोजगारी आणि मूल्यांचा ऱ्हास या समस्या युवकांसमोर उभ्या आहेत. अशा परिस्थितीत बाबासाहेबांचा संदेश युवकांना योग्य दिशा देतो. त्यांनी दिलेला आत्मविश्वास आणि संघर्षाची प्रेरणा युवकांना सक्षम बनवते.

तंत्रज्ञानाच्या युगात माहितीचा प्रसार अत्यंत वेगाने होत आहे. परंतु या माहितीच्या प्रवाहात सत्य आणि असत्य यातील फरक ओळखणे महत्त्वाचे आहे. बाबासाहेबांनी तर्कशुद्ध विचारसरणीचा पुरस्कार केला. त्यांनी अंधश्रद्धा आणि चुकीच्या समजुतींना विरोध केला. आजच्या काळात त्यांच्या या विचारांची गरज अधिक जाणवते.

लोकशाही ही केवळ मतदानापुरती मर्यादित नसून ती नागरिकांच्या सक्रिय सहभागावर अवलंबून असते. बाबासाहेबांनी लोकशाहीचे तत्त्वज्ञान स्पष्ट करताना सांगितले की, लोकशाही टिकवण्यासाठी समाजात समता आणि बंधुता असणे आवश्यक आहे. आजच्या काळात लोकशाही मूल्यांचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. बाबासाहेबांचे जीवन हे एक प्रेरणादायी प्रवास आहे. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून उभे राहून समाजात परिवर्तन घडवून आणले. त्यांच्या जीवनातून आपल्याला शिकायला मिळते की, ज्ञान, परिश्रम आणि दृढनिश्चय यांच्या बळावर कोणतीही अडचण पार करता येते. त्यांनी दाखवलेला मार्ग हा संघर्षाचा, पण त्याचबरोबर आशेचा मार्ग आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण केवळ औपचारिक अभिवादन करून थांबू नये. त्यांच्या विचारांचे आचरण करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. समाजात समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांची स्थापना करण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. बाबासाहेबांनी दिलेला संदेश हा आजही तितकाच प्रभावी आहे. आजच्या भारताला जर खऱ्या अर्थाने प्रगत, समतामूलक आणि न्याय्य राष्ट्र बनवायचे असेल, तर बाबासाहेबांचे विचार आपल्या जीवनात आणि समाजात रुजवणे आवश्यक आहे. शिक्षणाचा प्रसार, सामाजिक न्यायाची अंमलबजावणी, महिलांचे सक्षमीकरण आणि लोकशाही मूल्यांचे संरक्षण या सर्व बाबींच्या माध्यमातून आपण त्यांच्या स्वप्नातील भारत घडवू शकतो.

शेवटी, असे ठामपणे म्हणता येईल की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक कार्य हे केवळ इतिहासाचा भाग नाही, तर ते वर्तमान आणि भविष्याचा दीपस्तंभ आहे. त्यांच्या विचारांचा प्रकाश आपल्या मार्गाला उजळून टाकतो आणि आपल्याला योग्य दिशेने वाटचाल करण्याची प्रेरणा देतो. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण सर्वांनी एकच संकल्प करूया. समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांना आपल्या जीवनात स्थान देऊन, एक न्याय्य आणि सुसंस्कृत समाज निर्माण करण्यासाठी कटिबद्ध राहूया. हीच त्यांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल.

**- डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**ईमेल** - bagate.rajendra5@gmail.com

## 'एक मे पासून पुणे सोलापूर विमानसेवा सुरू', आता चाळीस मिनिटात पुण्यात पोहोचणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : स्टार एअर कंपनीने सोलापूर पुणे व पुणे सोलापूर हे विमानसेवा सुरू केली आहे, एक मे पासून ही सेवा सुरू राहणार असून सातही दिवस विमानसेवा सुरू राहणार आहे.

सोलापूर गोवा विमानसेवा सुरू झाली आहे. सोलापूर पुणे व पुणे सोलापूर विमानसेवा सुरू करण्यात यावी, अशी मागणी प्रवाशातून होत होती याची दखल स्टार एयर कंपनीने घेतले असून उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही विमानसेवा एक मे पासून दररोज सुरू करण्यात येणार आहे.

४० मिनिटात प्रवासी सोलापूर ते पुणे येथे पोहोचणार आहेत सोमवार ते शुक्रवार सोलापूर येथून दुपारी दोन वाजून ३० मिनिटांनी विमान उड्डाण करणार असून ते पुणे येथे तीन वाजून वीस मिनिटांनी पोहोचणार आहे तर पुणे सोलापूर ४० मिनिटाच्या वाजता चार वाजता सोलापूरकडे उड्डाण करण्यात येणार आहेत. व चार मिनिटांनी पन्नास वाजता सोलापूर येथे पोहोचणार आहे, तसेच दर शनिवारी व सोमवारी येथून चार वाजून वीस मिनिटांनी पुण्याकडे उड्डाण करणार असून पुणे येथे चार वाजून ५५ मिनिटांनी पोचणार आहे यानंतर लगेचच तिथून सोलापूरकडे उड्डाण करणार आहे सोलापूर पुणे व पुणे सोलापूर प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे त्यामुळे येथे रेल्वे प्रशासनाने अनेक गाड्यांचा कोळंबा आहेत तरीही प्रवाशांनी गैरसोई होत असून लवकरात पोहोचावे प्रवाशातून होत आहे. यासाठी स्टार एअर वेजने विमानसेवा सुरू केली आहे. त्यामुळे ४० मिनिटांमध्ये पुण्यामध्ये पोहोचणार आहे.

## सामाजिक समता सप्ताह निमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन व विविध कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दि.३० मार्च २०२६ अन्वये दि.०८ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत जिल्ह्यात विविध उपक्रम राबवून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले.

आज दि. १४ एप्रिल २०२६ रोजी सहायक आयुक्त समाज कल्याण सोलापूर कार्यालयामार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, सोलापूर येथे त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास सोलापूर महापालिकेचे महापौर विनायक कोंडयाल, सोलापूर शहर दक्षिणचे आमदार सुभाष देशमुख, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण सभापती श्रीमती संस्कृती सातपुते व समाज कल्याण च्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

तद्नंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते समाज कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी तयार करण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. तसेच अनुसूचित जाती अत्याचार प्रतिबंध कायदा अंतर्गत खून प्रकरणातील वारस श्री. आनंद भारत लोंढे यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शासकीय नोकरीबाबत नियुक्तिपत्र देण्यात आले.



यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या व त्यांच्या विचारांचा प्रसार व सामाजिक समतेच्या मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमास मागासवर्गीय वसतिगृहातील विद्यार्थी, विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन सहायक आयुक्त समाज कल्याण सोलापूर कार्यालयाच्या वतीने करण्यात आले.